**शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे**

**डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा.**

**मराठी विभाग** दिनांक १९/०८/२०२३.

**वाङ्मय मंडळ उदघाटन समारंभ अहवाल**

शिक्षक संचालित शिक्षण संस्थेच्या डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वाडा च्या मराठी विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २३-२४ साठी मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. मराठी वाङ्मय मंडळाच्या स्थापनेकरीता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आवाहन करण्यात आले. या आवाहनाला प्रतिसाद मिळून १० विद्यार्थ्यांचे मंडळ निश्चित करण्यात आले.

मराठी वाङ्मय मंडळाचे औपचारिक उद्घाटन १८/०८/२०२३ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटन कथाकार प्रा. विवेक कुडू मराठी विभागप्रमुख सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर यांचे व्याख्यानाने करण्यात आले. उद्घाटन समारंभ महाविद्यालयाचा चर्चासत्र सभागृह येथे दिनांक १८/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न झाला. कार्यक्रमाचे संचालन नियोजित मंडळाच्या सदस्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि देवी सरस्वती यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. कैलास जोशी, मराठी विभागप्रमुख यांनी केले तर प्रमुख अतिथी प्रा.विवेक कुडू यांची ओळख प्रा. डॉ. किरणकुमार कवठेकर यांनी करून दिली. महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. प्रा. डॉ. किशोरी भगत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी कला आणि साहित्य यांचे महत्त्व प्रतिपादित केले. प्रमीख अतिथी प्रा. विवेक कुडू यांनी मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनाची औपचारिक घोषणा केली आणि ‘ कथालेखन- अनुभव व निर्मिती’ या विषयावर मनोगत व्यक्त केले. आपल्या व्याख्यानाचा सूर अनौपचारिक ठेवत त्यांनी आपल्या कथालेखनामागची भूमिका आणि अनुभव स्पष्ट केले. आलेल्या अनुभवाचे कथेत रुपांतर होताना काय होते, हे त्यांनी समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश पट्टेबहादूर आणि वैष्णवी पंडागळे यांनी केले. आभार आकाश पट्टेबहादूर याने व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

डॉ. कैलास प्रभाकर जोशी.

मराठी विभागप्रमुख

कार्यक्रमाची निवडक छायाचित्रे.
















